## लताबाई भगुरे व इतर विरुध्द बाबुलाल भगुरे व इतर

## निशाणी क्र. ६५ खाली आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याने त्याच्या विरुध्द झालेला विना उलटतपास प्रकरण चालविण्याचा आदेश रद्द करण्याबाबत दाखल केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र. १ चे कथन आहे की, प्रतिवादी हा बाहेरगावी असल्याने पुराव्याकरीता आवश्यक माहिती व कागदपत्र मिळकण्यास असमर्थ राहिलेला आहे परिणामी त्याच्या विरुध्द उलटतपास असा आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादी क्र. १ चे पुढे असेही कथन आहे की, त्याला उलट तपासाची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे त्याच्या विरुध्द झालेला विना उलटतपासाचा आदेश रद्द करुन मिळण्याची त्याने विनंती केली आहे.

०३. वादीचे वकील श्री. एम.एल.चट्टे यांनी सदरच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन कथन केले की, प्रतिवादी हे मागील दिनांक १७.०८.२०२३ पासुन वादीचा उलटतपास घेत नाहीत. वादी लताबाई ही सद्या मजुरी कामानिमीत्त सिकंदराबाद येथे राहते. वादी ही मागील दोन ते तीन वेळा सिकंदराबाद येथुन येऊन परत गेलेली आहे. तसेच प्रतिवादी विरुध्द यापुर्वी दोन वेळा विना उलटतपास आदेश पारित केला आहे. त्यापैकी एकदा आदेश रद्द करुन घेतला व त्याची कॉस्ट भरली नाही आणि उलटतपास घेतला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात येण्याची वादीने विनंती केली आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे साक्षीदार क्र. १ वादी स्वत: हिने तिचे सरतपासाचे शपथपत्र दिनांक २७.०१.२०२२ रोजी दाखल केले असुन दिनांक १७.०८.२०२३ रोजी तिचा पुढील सरतपास नोंदवण्यात आला. सदर दिवशी प्रतिवादी क्र. १ याने साक्षीदाराच्या उलटतपासासाठी मुदत वाढीचा अर्ज निशाणी क्र. ६१ वर सादर केला. सदरचा अर्ज निशाणी क्र. ६१ अर्ज खर्च रुपये १००–/ सह मंजुर करण्यात आला. त्यानंतर दिनांक १९.०८.२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १ याच्या वकीलांनी निशाणी क्र. ६३ वर अर्ज दाखल करुन साक्षीदाराच्या

उलटतपासासाठी वेळ मागीतली. सदरचा अर्ज खर्च रक्कम रुपये ५००/– सह मंजुर करण्यात येऊन खर्च शासन जमा करण्याचा आदेश पारित करण्यात आला. परंतु तद्नंतर सदर दिवशी प्रतिवादी व त्यांच्या वकीलांचा पुकारा केला असता ते गैरहजर राहिले तसेच त्यांनी त्यांना लागलेला खर्च रक्कम रुपये ५००/– जमा केली नाही. त्यामुळे दिनांक ०६.०९.२०२४ रोजी परत प्रतिवादी क्र. १ च्या विरुध्द उलटतपास नाही असा आदेश रद्द करण्याची विनंती केली असुन ते उलटतपास घेण्यास तयार आहेत असे नमुद केले आहे. सदरचा दावा हा वादीने प्रतिवादी विरुध्द मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केलेला असुन नैसर्गीक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही बाजु ऐकुण घेतल्यानंतर दाव्याचा निकाल देणे संयुक्तीक ठरेल त्याकरीता प्रतिवादी क्र. १ याला वादीचा उलटतपास घेण्यास परवानगी देणे मला आवश्यक वाटते. परंतु झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी क्र. ०१ वर आर्थीक स्वरुपात दंड लावणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश.**

**०१**. अर्ज निशाणी क्र. ६५ हा खर्च १,०००/– सह मंजुर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादी क्र. १ विरुध्द पारीत केलेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करण्यात येतो.

**०३**. प्रतिवादी क्र. १ याने निशाणी क्र. ६१, ६३ व ६५ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर वरील आदेश अंमलात येतील व त्याला साक्षीदारांचा उलटतपास घेता येईल.

MANDAR MOHAN RAUT
Digitally signed by MANDAR MOHAN RAUT
Date: 2024.12.04 11:30:11 +0530

दिनांक ०३.१२.२०२४.

(**मंदार मो. राऊत**)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सेलू जि. परभणी